# प्रकरण – २
# (नियम पुस्तिका – १)

**२.१ माहिती :**

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्रिंसेस स्ट्रीट उड्डाण पूल ते बांद्रा वरळी सागरी सेतूच्या वरळी टोकापर्यंत असा तीन आंतरबदल (interchanges) असलेला १०.५८ किमी लांबीचा ८ लेन (४ + ४) किनारी रस्ता प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पात प्रत्येकी २.०७ किमी लांबीच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज जुळ्या बोगद्याचा समावेश आहे. तसेच या प्रकल्पात अमरसन गार्डन, हाजी अली जंक्शन आणि वरळी समुद्र किना-यावर तीन इंटरचेंजेस समाविष्ट आहेत. पुन:प्रापण करुन तयार केलेले सुमारे ७० हेक्टर क्षेत्र हरितपट्टा आणि मनोरंजन सुविधांसाठी असेल. या प्रकल्पात समर्पित बस लेन व बस डेपोच्या सुविधेनुसार सार्वजनिक वाहतूक सुविधांचा समावेश आहे आणि सुमारे १८०० कारची एकत्रित क्षमता असलेले चार भूमिगत पार्किंग क्षेत्रे आहेत. प्रकल्पाचे काम ऑक्टोबर २०१८ पासून सुरू झाले असून डिसेंबर २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत रु.१२७२१ कोटी आहे.

**२.२ मुंबई किनारी रस्ता प्रकल्पाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.**

- रस्त्यांची लांबी १०.५८ किमी
- पुलांची एकूण लांबी: २.१९ किमी
- मार्गिका संख्या: ८ (४+४) (बोगदयामध्ये ३+३)
- भराव टाकून बनवलेल्या रस्त्याची लांबी ४.३५ किमी
- बोगदे: दुहेरी बोगद्याची लांबी: प्रत्येकी २.०७ किमी, ११ मी. अंतर्गत व्यास (प्रत्येकी ३ वाहनमार्गिका)

- भूमिगत वाहनतळ : ०४ एकूण वाहनसंख्या : १८००
- एकूण भरावक्षेत्र: १११ हेक्टर
- मनोरंजन / हरित क्षेत्र: अदाजे ७० हेक्टर
- आंतरबदल: ०३, आंतरबदलाची लांबी : १५.६६ किमी
- सागरी पदपथ ८.५५ किमी.
- बसवाहतूकीसाठी समर्पित मार्गिका
- सागरी तटरक्षक भिंत: ७.४७ किमी.

२.३ **सागरी किनारी रस्ता प्रकल्पाचे फायदे:**

- सागरी किनारी रस्त्यामुळे प्रवासास लागणारा कालावधी कमी होईल व सार्वजनिक वाहतुकीस चालना मिळेल.
- सागरी मार्गामुळे शहरातील वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल. रोजच्या येण्याजाण्याच्या वेळेची बचत झाल्यामुळे, मुंबईकरांचे जीवनमान सुधारेल.
- वाहतूक गतीमान झाल्यामुळे मुंबईची आर्थिक प्रगती होऊ शकेल आणि नवीन रोजगार निर्मितीच्या संधी उपलब्ध होतील.
- ध्वनीप्रदुषण, वायूप्रदुषण कमी होईल.
- अतिरिक्त ७० हेक्टर हरितक्षेत्रामुळे प्रदुषण कमी होण्यास मदत होईल व सदर हरितक्षेत्रामुळे मुंबईकरांचे जीवनमान सुधारेल.
- सागरी किनारी रस्त्यावर बस वाहतूकीसाठी (BRTS) व रुग्णवाहिकांसाठी २.७५ मी. रुंदीची स्वतंत्र आणि समर्पित आपत्कालीन मार्गिका नियोजित असल्याने आपत्कालीन वाहतूक जलद होईल.
- मुंबईकरांना सागरकिनारी अतिरिक्त प्रोमोनेड उपलब्ध होतील. प्रस्तावित सागरी तट रक्षक भिंत नियोजित केल्यामुळे सध्याच्या सागरी किना-याची धूप होण्यापासून संरक्षण होईल तसेच वादळी लाटा व पूरापासून संरक्षण होईल

## २.४ संस्थेची कार्ये व कर्तव्य यांचा तपशिल

- डीबीसी, पीएमसी, जीसी आणि विविध शासकीय व इतर विभाग यांच्याशी समन्वय साधणे.
- प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार आणि साधारण सल्लागारामार्फत कामाच्या आर्थिक आणि भौतिक प्रगतीचा आढावा घेणे
- कंत्राटदारांनी सादर केलेले आणि प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व साधारण सल्लागार यांनी शिफारस व पडताळणी केलेले फेरफार/वाढीव कालावधी संबंधी प्रस्ताव महानगरपालिका आयुक्त/अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त यांच्या मान्यतेसाठी सादर करणे.
- सल्लागारांद्वारे प्रमाणित असलेली देयके एसएपी सिस्टमद्वारे तयार करणे.
- विविध सल्लागारांची देयके प्रक्रिया करणे.
- तारांकित, अतारांकित प्रश्न / तक्रारी / जनता व लोक प्रतिनिधींकडून प्राप्त झालेल्या पत्रांना उत्तर देणे आणि लेखा आक्षेप, दक्षता निरिक्षणे इ. यांना उत्तर देणे.
- प्रशासन आणि इतर विभाग/विविध शासकीय विभागांसोबत किनारी रस्ता प्रकल्पाशी संबंधीत विविध बैठकांना उपस्थित राहणे.
- किनारी रस्ता प्रकल्पा संबंधित विविध कायदेशीर बाबी महानगरपालिकेच्या कायदेशीर विभागामार्फत हाताळणे.
- कामाच्या सुरळीत अमंलबजावणीसाठी साधारण सल्लागार, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार, कंत्राटदार तसेच विविध विभाग आणि विविध उपयोगिता सेवा यांच्याशी समन्वय साधणे.

## २.५ प्रमुख अभियंता (किनारी रस्ता प्रकल्प) खात्यातील पदांचा (संवर्गांचा) तपशील

**वेतनपत्रक क्र. = 1856**

| अ. क्र. | पद / संवर्ग | एकूण पदे | | | भरलेली पदे | | | रिक्त पदे | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनुसुचित पदे | अन-अनुसुचित पदे | एकूण | अनुसुचित पदे | अन-अनुसुचित पदे | एकूण | अनुसुचित पदे | अन-अनुसुचित पदे | एकूण |
| 1. | प्रमुख अभियंता | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 |
| 2. | उप प्रमुख अभियंता | 1 | 1 | 2 | 1 | 0 | 1 | 0 | 1 | 1 |
| 3. | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | 3 | 3 | 6 | 3 | 0 | 3 | 0 | 3 | 3 |
| 4. | कार्यकारी अभियंता (यांववि ) | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| 5. | सहाय्यक अभियंता (स्थापत्य.) | 4 | 1 | 5 | 4 | 1 | 5 | 0 | 0 | 0 |
| 6. | सहाय्यक अभियंता (यां. व वि.) | 2 | 0 | 2 | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 1 |
| 7. | दुय्यम अभियंता (स्थापत्य.) | 8 | 0 | 8 | 8 | 0 | 8 | 0 | 0 | 0 |
| 8. | दुय्यम अभियंता (यां व वि.) | 4 | 0 | 4 | 3 | 0 | 3 | 1 | 0 | 1 |
| 9. | प्रशासकीय अधिकारी | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 |
| 10. | मुख्य लिपिक | 1 | 1 | 2 | 0 | 1 | 1 | 1 | 0 | 1 |
| 11. | आरेखक | 2 | 0 | 2 | 2 | 0 | 2 | 0 | 0 | 0 |
| 12. | कनिष्ठ लघुलेखक | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 |
| 13. | लिपिक | 3 | 0 | 3 | 3 | 0 | 3 | 0 | 0 | 0 |
| 14. | शिपाई | 3 | 0 | 3 | 3 | 0 | 3 | 0 | 0 | 0 |

**२.६ प्रमुख अभियंता (किनारी रस्ता प्रकल्प) खात्यातील**

